# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No.MISC-(2007/ (322/07) UNI-4
Under Sub Section (2) of Section-3 of the Maharashtra University Act 1994 (Mah.XXXV of 1994)

## NATIONAL SERVICE SCHEME

**Dr. I. S. Mohurley** ☎9421719303
**Programme Coordinator** E-mail: ishwarmohurley@gmail.com

No.GU/NSS/ 17/2015 Date: 09/02/2015

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
संलग्नित सर्व रासेयो महाविद्यालये.

विषय:— **किनवट, जि. नांदेड येथे 'श्रमश्री बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर' करिता विद्यार्थी पाठविणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, युवकांना सामाजिक कार्यासाठी प्रेरित करणे हा बाबा आमटे यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. युवकांची उर्जा राष्ट्रासाठी व समाजासाठी कशी उपयोगी आणता येईल याचा ते सतत विचार करित असत. त्यांचा युवकांवर खूप विश्वास होता व युवकांकडून त्यांना खूप आशा होती. युवकांच्या मनात निस्वार्थ सेवेची भावना बिंबविण्यासाठी त्यांनी ''आंतरभारती भारत जोडो श्रमसंस्कार छावणी'' १९७६ मध्ये सुरु केली.

बाबांनी जपलेली मुल्ये, त्यांचे प्रेरणादायी जीवन व कार्य युवा पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील व जिल्ह्यातील सुमारे ५०० युवकांचे **'श्रमश्री बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर'** दि. १२ ते १६ **फेब्रुवारी २०१५** या कालावधीमध्ये **किनवट, जि. नांदेड** येथे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता ११ फेब्रुवारी रात्री पर्यंत शिबिरस्थळी पोहचायचे आहे. आपल्या विद्यापीठातील २५ स्वयंसेवक/स्वयंसेविका व एक संघनायक सदर शिबिरामध्ये सहभागी होण्यास पाठवावयाचे आहेत. यात १००/— रु. प्रत्येकी प्रवेश फी असेल तसेच भोजन व निवासाची व्यवस्था आयोजक संस्थेमार्फत करण्यात येईल आणि जाणे—येणेचा प्रवासखर्च हा रासेयोच्या नियमित कार्यक्रम अनुदानातून करावयाचा आहे.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील इच्छुक रासेयो स्वयंसेवकांचे नामनिर्देशन करण्याकरिता कार्यक्रम समन्वयक डॉ. ईश्वर मोहुर्ले यांचेशी थेट ७७७४०२७६६१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा किंवा खालील व्यक्तींशी संपर्क साधून विद्यार्थी शिबिरात पाठवावे.

कळावे.

धन्यवाद!

डॉ. ईश्वर श्री. मोहुर्ले
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

संपर्क : डॉ. अशोक बेलखोडे : ९८२२३१२२१४
श्री. पकाश ढोबळे, : ९४२२४९६६२०
श्री. नितीन टापरे : ७८४१८६५४१६

भारत जोडो युवा अकादमी आयोजीत

# श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर

किनवट जि.नांदेड

संपर्क : साने गुरुजी रुग्णालय, किनवट जि.नांदेड-४३१८०४

E-mail- jodobharat@rediffmail.com mob. 9822312214, 9422469564, 7841865416

जा.क्र                                                                                दिनांक: 15/1/2015

**प्रति,**

**समन्वयक ,**

**राष्ट्रीय सेवा योजना,**

गोंडवाना युनिवर्सिटी,

गडचिरोली.

**विषय : किनवट, जि : नांदेड येथे " श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर "**

**- १२ ते १६ फेब्रुवारी २०१५.**

आदरणीय महोदय / साथी,

हे वर्ष सुप्रसिद्ध समाज सेवक श्री बाबा आमटे यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजारे झाले आहे हे आपल्याला माहितच आहे. बाबा केवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामाजिक कार्यकर्ते, समाज सुधारक, सामाजिक अभ्युदयाचे स्वप्न पाहणारे व आंदोलकच नव्हे तर स्वातंत्र्य सैनिक, विचारवंत व कवी सुद्धा होते. त्यांनी निस्वार्थपणे कुष्ठरोग्यांची सेवा तर केलीच पण याशिवाय राष्ट्रीय एकात्मता, सांप्रदायिक सद्भाव , पर्यावरण रक्षण आणि संवर्धन, युवकांना सामाजिक कार्यासाठी प्रेरित करणे, इत्यादी क्षेत्रातही प्रचंड काम केले.

युवकांना सामाजिक कार्यासाठी प्रेरित करणे हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. युवकांची उर्जा राष्ट्रासाठी व समाजासाठी कशी उपयोगी आणता येईल याचा ते सतत विचार करीत असत. त्यांचा युवकांवर खूप विश्वास होता व युवकांकडून खूप आशा होती. युवकांच्या मनात निस्वार्थ सेवेची भावना बिंबवण्यासाठी त्यांनी " आंतरभारती भारत जोडो श्रमसंस्कार छावणी " १९६७ मध्ये सुरु केली. चंद्रपूर जिल्ह्यातील मुल जवळ असलेल्या त्यांच्या सोमनाथ या प्रकल्पावर आजतागायत ही छावणी सुरु आहे. सोमनाथ शिबीर म्हणून ही छावणी युवकांमध्ये लोकप्रिय आहे.

Shri Narwade
Put up
27/1

राष्ट्रीय एकात्मता, सांप्रदायिक सदभाव, पर्यावरण रक्षण आणि संवर्धन इत्यादी विषयांवर जागृती निर्माण करण्यासाठी ते सुमारे २०० युवकांना घेऊन देशभर फिरले. जेव्हा आपल्या देशाचे अनेक तुकडे पडणार की काय अशी परिस्थिती निर्माण झाली, त्यावेळी " भारत जोडो " अभियाना अंतर्गत दोन सायकल यात्रा, पंजाब मध्ये तीन वेळा " पीस बाय पीस मिशन " व मुंबई दंगलीत दंगलग्रस्तांसोबत वास्तव्य करून राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्राण पणाला लावले.

या त्यांच्या सर्व धडपडीतून अनेक लोकप्रिय व अर्थपूर्ण नारे पुढे आलेत जे अजूनही युवा पिढीला प्रेरणादायी व दिशादर्शक ठरत आहेत.

" श्रम ही है श्रीराम हमारा "

" हाथ लगे निर्माण में, नही मांगने नही मारने "

" कश्मीर हो या कन्याकुमारी, भारत माता एक हमारी "

" ओखा हो या गोहाटी, अपना देश अपनी माटी "

" जात पात के बंधन छोडो, भारत जोडो, भारत जोडो "

" भाषा भेद छोडो छोडो, भारत जोडो, भारत जोडो "

" प्रांत भेद छोडो छोडो, भारत जोडो, भारत जोडो "

यासारखे नारे अजूनही अनेक युवा शिबिरांमध्ये दिले जातात एवढे ते आजही समयोचित आहेत.

बाबांनी जपलेली मुल्ये, त्यांचे प्रेरणादायी जीवन व कार्य युवा पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील व जिल्ह्यातील सुमारे ५०० युवकांचे एक शिबीर **( श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर ) नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे १२ ते १६ फेब्रुवारी २०१५** ला आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात राष्ट्रीय एकात्मता, सांप्रदायिक सद्भाव, पर्यावरण रक्षण आणि संवर्धन, सामाजिक जाणीव, राष्ट्र निर्मितीत युवा पिढीची भूमिका इत्यादी विषयांवर विचारमंथन होणार आहे. थोर गांधीवादी विचारवंत डॉ श्री एस . एन . सुब्बाराव( भाईजी ) , डॉ विकास आमटे, डॉ राम पुनियानी, उल्का

महाजन, विजय दिवाण (औरंगाबाद), गिरीश कुलकर्णी ( स्नेहालय ), सेवांकुरचे डॉ अविनाश सावजी, डॉ रवि कोल्हे ( मेळघाट ), श्री भवानीशंकर कुसुम ( राजस्थान), आर. सुन्दरेषण (तामिळनाडू), प्रा. डॉ. सोमनाथ रोडे इत्यादी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिराचे आयोजन किनवट या आदिवासी भागात होत असून **" भारत जोडो युवा अकादमी " या संस्थेने आयोजनाचे आव्हान स्वीकारलेले आहे.** अकादमी च्या माध्यमातून बाबांचे अनुयायी व भारत जोडो अभियानाचे संघटक डॉ अशोक बेलखोडे हे मागील २१ वर्षांपासून या आदिवासी क्षेत्रात सामाजिक कार्य करीत आहेत. या शिबिराच्या निमित्ताने हे कार्य तरुण पिढीपर्यंत पोहचणार आहे.

*या शिबिरात दररोज **सकाळी साडे तीन तास श्रमदान,**दुपारी विविध विषयावर चर्चा , मार्गदर्शन, संवाद, **रात्री सांस्कृतिक, इत्यादी सोबतच जंगलभ्रमण,युवा आयकॉन्स सोबत भेटी-गाठी व संवाद अशी मेजवानी असणार आहे .*

काही प्रस्तावित विषय व वक्ते खालीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय एकात्मता | सांप्रदायिक सद्भाव | डॉ राम पुनियानी |
| | दहशतवाद | यशवंत सुमन |
| | जात व धर्म | सुभाष वारे<br>किशन चोपडे |
| पर्यावरण | जल | विजय दिवाण |
| | जंगल | मोहन हिराबाई हिरालाल<br>देवाजी तोफा |
| | जमीन | उल्का महाजन |
| सामाजिक कार्यासाठी युवकांना प्रेरणा | गिरीश कुलकर्णी, डॉ शशिकांत अहंकारी,<br>डॉ अशोक बेलखोडे , अतुल देऊळगावकर<br>अशोक भारत , डॉ अविनाश सावजी<br>कल्पना परुळेकर , संजय साळुंखे ,प्रा. सविता शेट्ये<br>राजकुमार सिन्हा, डॉ.स्मिता कोल्हे,रवी बापटले,<br>संतोष गर्जे माधव बावगे ई. | |

| | | |
|---|---|---|
| बाबांचे साहित्य | साहित्य संमेलन | सुरेश द्वादशीवार<br>प्रा डॉ सोमनाथ रोडे<br>दीपक शिव<br>प्रा. धनगर |
| बाबांचे प्रकल्प | | डॉ शीतल आमटे,अनिकेत आमटे<br>,जगन मचकले, अरुण कदम<br>सुधाकर कडू |

शिबिरातील सर्व सत्रांमध्ये सक्रीय सहभाग घेऊन सर्व विषय समजून घ्यावेत.

या शिबिरासाठी आपण आपल्या विद्यापीठातील **जास्तीत जास्त पंचवीस** विद्यार्थी पाठवावेत. **प्रत्येकी १०० रुपये प्रवेश फी असेल. जाण्यायेण्याचा खर्च शिबिरार्थ्यांनाच करायचा आहे. भोजन व निवास व्यवस्था विनामुल्य करण्यात आलेली आहे. थंडीचे दिवस असल्यामुळे उबदार कपडे व पुरेसे पांघरूण आणायचे आहे. शिबिरार्थींनी दि ११ फेब्रु. रोजी रात्री पर्यंत शिबीरस्थळी पोहचावे.**


आपला,

डॉ अशोक बेलखोडे ( 98 22 31 22 14 ),

भारत जोडो युवा अकादमी,

किनवट, जि. नांदेड.

अधिक माहितीसाठी संपर्क ....इंजि. प्रकाश ढोबळे -९४ २२ ४९ ६६ २०...

नितीन टापरे- ७८ ४१ ८६ ५४ १६.


आपण शिबिरात सहभागी होत असल्याबद्दल ४ फेब्रुवारी २०१५ पर्यंत किंवा त्या अगोदर लवकरात लवकर केव्हाही एस.एम.एस./इ-मेल/पत्राद्वारे कळवावे.